Vol 5 Issue 10 April 2016 ISSN No :2231-5063

# International Multidisciplinary Research Journal

# Golden Research Thoughts

Chief Editor
Dr.Tukaram Narayan Shinde

Publisher
Mrs.Laxmi Ashok Yakkaldevi

Associate Editor
Dr.Rajani Dalvi

Honorary
Mr.Ashok Yakkaldevi

Welcome to GRT

RNI MAHMUL/2011/38595 ISSN No.2231-5063

Golden Research Thoughts Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial board.Readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

## Regional Editor

Manichander Thammishetty
Ph.d Research Scholar, Faculty of Education IASE, Osmania University, Hyderabad

## *International Advisory Board*

Kamani Perera
Regional Center For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus PopPhD, Partium Christian University, Oradea,Romania

Mohammad Hailat
Dept. of Mathematical Sciences, University of South Carolina Aiken

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences Al. I. Cuza University, Iasi

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Dept of Chemistry, Lahore University of Management Sciences[PK]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

......More

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University,Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University,Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary,Play India Play,Meerut(U.P.)

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh,
Vikram University, Ujjain

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU,Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra
Maulana Azad National Urdu University

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.aygrt.isrj.org**

ISSN: 2231-5063 Impact Factor : 3.4052(UIF) Volume - 5 | Issue - 10 | April - 2016

Golden Research Thoughts

GRT

# ग्रामीण लेखिकांच्या कथेतील सहजस्वाभाविक विनोद

प्रा. डॉ. जया जितेंद्र कदम
मराठी विभाग प्रमुख,
मु. सा. काकडे महाविद्यालय,सोमेश्वरनगर, बारामती, पुणे.

## प्रास्ताविक

ग्रामीण परिसर तसा दुःख, दैन्य, परंपरा यांनी ग्रासलेला आहे. त्यामुळे विनोदासाठी फारसा अनुकूल परिसर नसतो. तरीही अनेक ग्रामीण लेखकांनी ग्रामीण जीवनातील विसंगती शोधून विनोदी कथा लिहिलेल्या दिसतात. व्यंकटेश माडगूळकर, शंकर पाटील, द. मा. मिरासदार, आनंद यादव, बा. भ. पाटील, द. ता. भोसले, बाजीराव पाटील, बा. ग. केसकर, द. स. काकडे, उद्धव शेळके, व. बा. बोधे अशा अनेक ग्रामीण लेखकांनी ग्रामीण जीवनातील अनेक विषय विनोदातून मांडलेले दिसतात. लेखिकांपैकी प्रतिमा इंगोले, अनुराधा गुरव आणि लक्ष्मीकमल गेडाम यांच्या कथेत काहीप्रमाणात विनोद येतो.

प्रतिमा इंगोले यांच्या कथांचे अनुभवक्षेत्र पाहिल्यानंतर असे दिसते की, ग्रामीण भागातील वास्तवतेचे चित्र रेखाटताना त्यांनी सामाजिक आशयाला महत्त्व दिले आहे. कुटुंबाच्या सीमारेषा ओलांडून कृषिप्रधान ग्रामव्यवस्था, ग्रामीण संस्कृती, शिक्षण, राजकारण, विनोद अशा अनेक अंगांनी त्यांचे अनुभवविश्व विस्तारत गेल्यामुळे या कथांचा परीघ व्यापक बनला आहे. यांच्या 'हजारी बेलपान' आणि 'उलटे झाले पाय' या संग्रहातील कथांमध्ये विनोद अनुभवायला मिळतो. स्वाभाविक, प्रसंगनिष्ठ, व्यक्तिनिष्ठ असे विनोदाचे प्रकार त्यांच्या कथेत येतात. त्यांच्या कथांमधून तऱ्हेवाईक माणसांचे नमुने, सामाजिक रूढी, परंपरा, अंधश्रद्धा, विलक्षण घटना यातून विनोद निर्माण झालेला दिसतो. कधी–कधी पात्रांच्या विक्षिप्त स्वभावातून तर कधी अकस्मात उद्‌भवणाऱ्या परिस्थितिजन्य घटनेतून आपोआपच विनोदनिर्मिती होते. उदा. 'समाजसेवा' ('उलटे झाले पाय') या कथेत समाजसेवेच्या व्रतामुळे एका वेडयाला नायिका तूप पोळी देते. पण त्याच्या विक्षिप्त स्वभावाने नायिकेला कोणकोणत्या प्रसंगांना सामोरे जावे लागते. त्याचे मजेदार चित्रण लेखिका करते. बदललेल्या समाजजीवनात खरी समाजसेवा करणाऱ्यांची फजिती होते आणि समाजसेवेचे ढोंग करणाऱ्यास मात्र डोक्यावर घेतले जाते. हे वास्तव एका प्रसंगाच्या माध्यमातून 'समाजसेवा' या कथेत प्रभावीपणे मांडले आहे. समाजसेवेचा मिळालेला वारसा आणि माणुसकीची भावना या नात्याने कथेतील नायिका वेडसर माणसाला तूपपोळी देते. पण तो वारंवार येऊन तूप पोळी मागू लागतो. नाही दिली तर अर्वाच्य शिव्या देऊन नाना प्रकारे त्रास देऊन तिला हवालदिल करतो. तिचे हे




समाजसेवेचे व्रत तिच्या चांगलेच अंगलट येते. एखाद्याची कला विकसित करण्याऐवजी तिचे खच्चीकरण करण्यात मराठी माणूस कसा पटाईत आहे. त्याच्यातील या प्रवृत्तीमुळे कलेची निर्मिती कशी भूमिगत होते याचा प्रत्यय 'गायनभक्ती' या कथेत येतो, तर 'वकिलीणबाई' या कथेत बाईला दुय्यम स्थानावर ठेवणाऱ्या समाजाच्या मानसिकतेचे मार्मिक चित्रण येते. ते चित्रण विनोदी अंगाने मांडले असले तरी त्यातील उपहासाची धार जाणकाराला बोचल्याशिवाय राहत नाही. स्त्रियांना सतत पुरुषांच्या आधाराने, नावाने उभे केले जाते. आणि त्याच आधारावर ओळखले जाते. या कथेतील नायिकेचा पती वकील असल्याने पूर्ण गाव तिला 'वकिलीणबाई' म्हणूनच ओळखत होते. यापेक्षा मोठी ओळख म्हणजे 'पुंडलीकरावांची सून'. त्यामुळेच नायिकेने म्हणजेच एका प्रतिष्ठित लेखिकेने गावात सांगितलेली कथा तिची स्वतःची राहत नाही तर ती पुंडलिकरावांच्या सुनेची होते. स्वतःची अशी वेगळी 'प्रतिमा' निर्माण करुनही नायिकेचे स्वतंत्र अस्तित्व नाकारले जाते. प्रत्येक गोष्टींमध्ये पुरुषप्रधान संस्कृतीच्या खुणा दडलेल्या दिसतात. एक लेखिका म्हणूनही तिचे स्वतंत्र अस्तित्वच समाज नाकारतो. ही गंभीर बाब लेखिका अत्यंत चिंतनशील वृत्तीने आणि विनोदशैलीने वाचकांसमोर आणते. 'जात' चोरण्याचा अनुभव केवळ बाबुराव बागूल यांच्याच वाटयाला येतो, असे नव्हे तर 'माणूस' ही जात मानणाऱ्या किंवा ''लेखकाला जातच नसते'' असे वाटणाऱ्या नायिकेच्या वाटयालाही हा अनुभव येतो.

जातचोरीचे विदारक सत्य आणि जातीविषयीची मानसिकता 'चोर ते चोर वर शिरजोर' या कथेत लेखिका अगदी मिस्किलपणे मांडते. असाच विदारक अनुभव 'बिनपगारी' या कथेत येतो. मोबदला न स्वीकारता केलेले काम आज समाजात उपहासाचा विषय ठरते. बदलत चाललेल्या शिक्षणविषयक मूल्यांचे दर्शन घडवतानाची लेखिकेची विनोदी शैली परिणामकारक ठरली आहे. 'करू गेलं काय अन् उलटे झाले पाय' या कथेत एस. टी. प्रवासातील एक हास्यकारक परंतु त्रासदायक अनुभव शब्दबद्ध केला आहे. पण अशा प्रवासातून नाना प्रकारची माणसे आणि स्वभाव अनुभवायला मिळतात. एस. टी. तील कन्डक्टर आणि सायकल ठेवणारा प्रवासी या दोन अव्वल स्वभावाच्या व्यक्तिरेखा. त्या दोघांचा निरर्थक वाद आणि आडमुठेपणा यामुळे नवऱ्यावर पाळत ठेवण्यासाठी निघालेल्या नायिकेवर मनाचे मांडे करण्याशिवाय पर्याय राहत नाही. "मराठी विनोदाच्या प्रांतात या लेखनाने एक लक्षणीय भर टाकली आहे." असे प्रतिमा इंगोले यांच्या विनोदी कथासंग्रहाविषयी विनोदी कथाकार द. मा. मिरासदार यांनी म्हटले असले, तरी द. मा. मिरासदार, शंकर पाटील आणि काही अंशी आनंद यादव यांच्या विनोदी कथेने जसे ग्रामीण कथेत वैशिष्ट्यपूर्ण स्थान निर्माण केले, तसे प्रतिमा इंगोले यांनी केलेले दिसत नाही. प्रतिमा इंगोले यांच्याजवळ ग्रामीण अनुभव विनोदी पद्धतीने शब्दांकित करण्याची कला अवगत असूनही त्यांनी प्रामुख्याने गंभीर प्रकृतीचे लेखन केले. 'हजारी बेलपान' या कथासंग्रहातील विनोदी कथांनंतर प्रथमच 'उलटे झाले पाय' मध्येच त्यांची मिस्किल शैली पाहायला मिळते.

वामन निंबाळकर यांनी ग्रामीण साहित्याच्या संदर्भात असे विधान केले आहे की, ''ग्रामीण अंधश्रध्दांवर, चमत्कारांवर हल्ला करणाऱ्या कथा ग्रामीण साहित्यात नाहीत.'' परंतु प्रतिमा इंगोले आणि अनुराधा गुरव यांनी काही कथांमधून ग्रामीण जीवनातील अज्ञान आणि अंधश्रद्धा यांचा विनोद निर्मितीसाठी प्रभावी वापर केलेला दिसतो. प्रतिमा इंगोले यांनी ग्रामीण जीवनातील रूढी, परंपरा, अंधश्रद्धा, अज्ञान यांचा वापर उपरोधाने करून विनोदनिर्मिती घडवून आणली आहे. 'भिकीचे कपळे', 'ठानं बाई अवचित', 'चोरावर मोर' हया कथांमधून ग्रामीण माणसाच्या मनात अंधश्रद्धा किती खोलवर रूजलेली आहे, हे वास्तव विनोदातून रेखाटले आहे. तसेच, 'मियॉ बिबी राजी', 'जोळन्हानी', 'हजारी बेलपान', 'गुरूप सेक्रेटरीचं पोट्टं' आणि 'वस्या हिकमते' इत्यादी कथांमधून ग्रामीण तरुण—तरुणींच्या जीवनातील भावभावनांचे दर्शन विनोदी शैलीतून येते. या सर्वच कथांसाठी लेखिकेने केलेला ग्रामीण पार्श्वभूमीचा आणि वऱ्हाडी बोलीचा वापर हे त्यांच्या विनोदी कथेचे वेगळे वैशिष्ट्य ठरते. एखादा गंभीर, चिंतनशील असा अनुभवही प्रतिमा इंगोले विनोदी वृत्तीतून, मिस्किलपणे सांगतात. आजही ग्रामीण भागात स्त्रीला नवऱ्याच्या कर्तृत्वावरून, व्यवसायावरून ओळखण्याची पद्धत आहे. स्त्री अस्तित्वाच्या दृष्टीने हा गंभीर प्रश्न आहे. लेखिकेला बोचणारी ही सल आणि परिस्थितीचा सहजपणे केलेला स्वीकार यातून लेखिका वाचकाला चिंतनप्रवृत्त करते. त्यादृष्टीने 'वकिलीणबाई' ('उलटे झाले पाय') या कथेचा शेवट पाहण्याजोगा आहे. ''गावात स्वतःच्या नावानी ओळखलं जाण्यापेक्षा अमक्याची सून म्हणून ओळखण्यात अधिक भारदस्तपणा असतो वा अधिक मार्दव असते. मग भलेही त्यात पुरुषप्रधान संस्कृतीच्या खुणा दडल्या असेना? पण त्यामुळे मीपणा गाडला जातो. एका वेगळया विकाराचं वेगळं असं दमनही त्यातून होते. शिवाय लेखकही तर समाजाची, संस्कृतीची, माणुसकीची व इतरांच्या भावभावनांची वकिलीच करतो ना? तसं पाहिलं तर एक लेखिका एक वकिलीणबाईच असते ना?'' ('उलटे झाले पाय', पृ. क्र. 40) इथे येणारे सगळेच प्रश्न उपरोधाने येतात हे जाणकाराला जाणवल्याशिवाय राहत नाही.

अनुराधा गुरव यांच्या 'इंगा' या कथासंग्रहात विनोदी किस्से असणाऱ्या काही कथा अनुभवायला मिळतात. ग्रामीण भागातील देवभोळेपणा, अज्ञान, अंधश्रद्धा यावर प्रकाश टाकण्याबरोबरच अतिबुद्धिप्रामाण्यवाद कसा तकलादू ठरतो; हे 'इंगा' कथेतील प्रा. राजन सर यांच्या व्यक्तिरेखेतून स्पष्ट होते. राजन सर देव—देवतांची पूजा करणाऱ्या श्रद्धाळू मनाची सतत हेटाळणी करत, त्यांना मूर्ख ठरवत. अशा या बुद्धिप्रामाण्यवादी राजन सरांना त्यांचे मित्र असा इंगा दाखवितात की, 'बुद्धिप्रामाण्याची ऐशी तैशी' म्हणण्याची वेळ त्यांच्यावर येते. परंतु वाचकाला ग्रामीण समाजातील बुवाबाजी, अंधश्रद्धा किती बिनबुडाची आहे याचे ज्वलंत अनुभव अशा कथांच्या माध्यमातून मिळतो. एकंदरीत, मनोरंजनाबरोबरच समाजप्रबोधन करण्याचा प्रयत्न लेखिकेने केलेला दिसतो. यांच्या 'इंगा' या संग्रहातील 'इंगा' आणि 'हात् तुजी लेव्ही गेली' या कथांमधील विनोद परिस्थितिजन्य अज्ञान, अंधश्रद्धा, पारंपरिकता आणि शोषणावर आधारलेला आहे. बाकीच्या कथांमधून येणारा विनोद बऱ्याचदा आत्मानुभवातून आलेला असल्याने त्याचे स्वरूप एकपदरी वाटते. 'कवी हरला कवी जिंकला', 'भोलाची प्रेयसी, तिचा प्रियकर आणि कावळयाचे पोरं', 'माझ्या घरची जेव्हा दाणादाण उडते', 'जावे त्याच्या वंशा' या कथांमधून येणारा विनोद एकपदरी आणि किस्सेवजा आहे. यातील कथाबीजे सशक्त आणि नावीन्यपूर्ण नाहीतच, पण निवेदनातही त्यांची विनोदी कथा बरीचशी अपुरी पडते. असे असलेतरी विनोदनातून समाजप्रबोधन घडवून आणण्याचा लेखिकेचा हा चांगला प्रयत्न आहे.

लक्ष्मीकमल गेडाम यांचे 'साद देती स्वप्नकळया' आणि 'शिवार फेरी' असे दोन ग्रामीण कथासंग्रह आहेत. या संग्रहातील कथांमधून ग्रामीण स्त्रीच्या व्यथा आणि श्रद्धा, पंरपरा जपणारे ग्रामीण मन विनोदी पद्धतीने रेखाटण्याचा प्रयत्न लेखिकेने केलेला आहे.

एकंदरीत, ग्रामीण लेखिकांच्या विनोदी कथांचा अभ्यास केल्यानंतर असे लक्षात येते की, द. ता. भोसले यांनी वीस वर्षापूर्वी ग्रामीण विनोदाची जी अवस्था सांगितली होती, तीच परिस्थिती या लेखिकांच्या कथांमधून आजही जाणवते. त्यांनी असे म्हटले होते की, ''विनोद निर्मितीच्या पारंपरिक कल्पना मनाशी धरून त्यात बसणारा ग्रामीण वास्तवाचा तुकडा विलक्षण पात्रांद्वारे प्रकट करणे म्हणजे विनोदी कथा.'' ग्रामीण लेखिकांचा विनोदही पारंपरिकतेतून बाहेर आलेला नाही. नावीन्यपूर्ण आणि वास्तवदर्शी अशा आशयाभोवती कथांची निर्मिती झालेली दिसत नाही. प्रतिमा इंगोले यांनी राजकीय आणि सामाजिक परिस्थितीतून आलेल्या अनेक पात्रप्रसंगांची निर्मिती केली. अशा बदलत्या वातावरणाचा विनोदासाठी प्रभावीपणे वापर त्यांना करता आलेला नाही. 'हजारी बेलपान' मधील विनोदाचे स्वरूप काहीसे एकांगी, एकपदरी आणि किस्सेवजा वाटते. तर 'उलटे झाले पाय' या संग्रहाला 'विनोदी कथा' असे लेखिकेने म्हटले असले, तरी यातील जवळ जवळ सर्वच कथांचा बाज आत्मप्रकटीकरणाचा आहे. त्यामुळे त्यांना विनोदी लेख किंवा ललित गद्याचे स्वरूप प्राप्त होते.

एकंदरीत, ग्रामीण लेखिकांच्या कथांमधून जो विनोद येतो, तो संख्यात्मकदृष्टया कमी आहेच. पण गुणात्मकदृष्टयाही वाखाणण्याजोगा नाही. मनोरंजन आणि समाजप्रबोधन हा या लेखिकांचा हेतू असला, तरी समाजजीवनातील विनोदी अनुभूतींचा कलात्मक आणि संपूर्ण आविष्कार त्यांना साधलेला नाही. तसेच, अनुराधा गुरव यांच्या कथेत विनोदी बाज व परिणामकारकता हव्या त्या प्रमाणात सापडत नाही. जीवनातील विसंगती सहदयतेने टिपून कलात्मक दर्शन घडवणारी अस्सल विनोदी कथा लिहिण्याऐवजी विनोदी किस्से किंवा एकाच प्रकारचे प्रसंग विनोदी कथेसाठी निवडलेले दिसतात. त्यांचे हे लेखन काही वेळा मनोरंजन करणारे असले, किंवा पात्रांबद्दल वाचकाच्या मनात सहानुभूती निर्माण करत असले, तरी कोणत्याही वेगळया अनुभूतीचा प्रत्यय या लेखनातून येत नाही. तराही विनोदनातून समाजप्रबोधन

घडवून आणण्याचा या लेखिकंचा हा चांगला प्रयत्न आहे.

### *संदर्भ ग्रंथ :*

1.होवाळ वामन : 'येळकोट', छत्रपती प्रकाशन, मुंबई, प्र. आ. 1982
2.भोसले, द. ता. : 'ग्रामीण साहित्य': एक चिंतन', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, प्र. आ. 1988, पृ. क्र. 51
3.इंगोले प्रतिमा : 'उलटे झाले पाय', दिलीपराज प्रकाशन प्रा. ली., पुणे., प्र. आ. 2006, प्रस्तावना– द. मा. मिरासदार

### *साधन सूची :*

1. इंगोले प्रतिमा : हजारी बेलपान', सोनल प्रकाशन, दर्यापूर, अमरावती, प्र. आ. 1984, तृतीयावृत्ती– 1997
2. 'उलटे झाले पाय', दिलीपराज प्रकाशन प्रा. ली., पुणे. प्र. आ. 2006
3. गुरव अनुराधा : इंगा', अजब पुस्तकालय, कोल्हापूर, प्र. आ. 1985
4.गेडाम लक्ष्मीकमल : 'साद देती स्वप्नकळया', सुविचार प्रकाशन, नागपूर. द्वि. आ. 2002

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Book Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- ✶ International Scientific Journal Consortium
- ✶ OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- EBSCO
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database
- Directory Of Research Journal Indexing

Golden Research Thoughts
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.aygrt.isrj.org